महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क्रमांक: नाविमं/संकीर्ण माध्य/3403
नागपूर, दिनांक 18/10/2023

प्रति,

प्राचार्य/मुख्याध्यापक
भंडारा, चंद्रपूर, नागपूर,
वर्धा, गडचिरोली, गोंदिया.

विषय:—जुन्या व नविन शाळा तसेच कनिष्ठ महाविदयालयांना प्रथम मंडळ मान्यता, मान्यता वर्धित करणे, व कायम मंडळ मान्यता देणेबाबत........

संदर्भ :— राज्य मंडळाचे क.रा.मं./परीक्षा—3/3729, पुणे, दिनांक 25/08/2023 चे पत्र.

उपरोक्त विषयाचे संदर्भिय पत्रास अनुसरून नागपूर विभागीय मंडळाचे अधिनस्त सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालयांस कळविण्यात येते की, राज्य मंडळ कार्यकारी परिषद ठराव कमांक 10 दिनांक 04 /08/2023 नुसार जुन्या/नविन शाळा व कनिष्ठ महाविदयालयांना प्रथम मंडळ मान्यता, मान्यता वर्धित करणे व कायम मंडळ मान्यता देणेबाबत धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर धोरणाचे पत्र मंडळाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी सर्व शाळा व कनिष्ठ महाविदयालयांनी त्यानुसार कार्यवाही करावी.

(चिंतामण वंजारी)
विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

| | | | |
|---|---|---|---|
| | शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे पूर्ण नाव, संबंधित लिपिकाचे नाव व स्वाक्षरी, दिनांक इत्यादी माहितीची नोंद करूनच प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. | ठरावाने कायम मंडळ मान्यता दिली त्या समितीचे नाव, सभेचा दिनांक व ठराव क्रमांक, संबंधित लिपीक, शाखाप्रमुख, शाखाधिकारी, सहाय्यक सचिव/सहसचिव यांचे नाव व दिनांकित स्वाक्षरी इ. माहितीची नोंद करुनच प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. | क्रमांक व संपूर्ण नाव ज्या समितीच्या ठरावाने कायम मंडळ मान्यता दिली त्या समितीचे नाव,सभेचा दिनांक व ठराव क्रमांक, संबंधित लिपिक, शाखाप्रमुख, शाखाधिकारी, सहाय्यक सचिव/सहसचिव यांचे नाव व दिनांकित स्वाक्षरी इ. माहितीची नोंद करूनच प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी.<br>याप्रमाणे विभागीय मंडळांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे. |
| ५ | कायम मंडळ मान्यता प्रमाणपत्रावरील क्रमांकाबाबत | कायम मंडळ मान्यता प्रमाणपत्रावर क्रमांक हा हाताने किंवा नंबरिंग मशीनने न नोंदविता तो गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर ज्या प्रकारे छपाई केलेले असतात त्याप्रमाणे ते छपाई केलेले असावेत. | कायम मंडळ मान्यता प्रमाणपत्रावर क्रमांक हाताने किंवा नंबरिंग मशिनने न नोंदविता ते छपाई केलेले असावेत.<br>याप्रमाणे विभागीय मंडळांना कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे. |
| ६ | कायम मंडळ मान्यता प्रमाणपत्रावरील मंडळ मान्यता व सांकेतांक क्रमांक या शब्दप्रयोगाबाबत | मंडळा मान्यता व सांकेतांक क्रमांक या ऐवजी मंडळ मान्यता व सांकेतिक क्रमांक असा शब्दप्रयोग करण्यात यावा. | कायम मंडळ मान्यतेच्या प्रमाणपत्रात सांकेतिक क्रमांक असा शब्दप्रयोम करण्यात यावा. |
| ७ | मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच संस्था सचिव व संस्था अध्यक्ष यांच्या संयुक्त स्वाक्षरीसह हमीपत्र घेणे. | शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास जरी कायम मंडळ मान्यता देण्यात आली असली तरी भविष्यातील गैरप्रकार, मंडळास सहकार्य न करणे, मंडळाच्या सूचनांचे पालन न करणे या व अशा बाबी निदर्शनास आल्यास देण्यात आलेली कायम मान्यता रद्द करुन नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल याची आम्हाला जाणीव असून केलेली कार्यवाही आम्हाला मान्य असेल अशा आशयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य तसेच संस्था सचिव व अध्यक्ष यांच्या संयुक्त | शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना कायम मंडळ मान्यता दिल्याबाबत जे पत्र देण्यात येते त्या पत्रात सदर बाब नमूद करावी मात्र, हमीपत्र घेऊ नये. |



सचिव

विषय क्रमांक – १०

कार्यकारी परिषद
दिनांक–०४/०८/२०२३

विषय–जुन्या व नविन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता देणे, मान्यता वर्धित करणे व कायम मान्यता देणे यासाठी धोरण निश्चित करणेबाबत. (परीक्षा–३)

ठराव :–

जुन्या व नविन शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना प्रथम मान्यता देणे, मान्यता वर्धित करणे व कायम मान्यता देणे यासाठी धोरण निश्चित करणेबाबत दि. ०६/०१/२०२३ च्या कार्यकारी परिषदेमध्ये ठराव पारीत झाला असून त्यानुसार सर्व विभागीय मंडळांना दि. २०/०४/२०२३ रोजीच्या पत्र क. रा.मं/परीक्षा–३/१६६९ अन्वये अंमलबजावणी करणेकरीता कळविलेले आहे.

त्याअनुषंगाने सेवानिवृत्त वरिष्ठ अधीक्षक, श्री. व्हि. टी. केतकर यांनी सुचविलेल्या सुचनांनुसार कायम मंडळ मान्यता व प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करतांना येणाऱ्या अडचणी/असलेल्या त्रुटी व नव्याने धोरणात अंतर्भूत कराव्या लागणाऱ्या काही बाबी खालीलप्रमाणे प्रस्तावित केल्या आहेत. सदर बाबी सभेपुढे सादर केल्या असता ज्या दुरूस्त्या स्विकारार्ह आहेत अशा बाबींवर सांगोपांग चर्चा करून त्या स्विकारून त्याप्रमाणे कायम मान्यता देण्यात येत असलेल्या प्रमाणपत्रात, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना जे कायम मान्यतेचे पत्र देण्यात येणार आहे त्यामध्ये नव्याने काही दुरूस्त्या सूचविल्या होत्या याबत खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली आहे.:–

| अक्र. | दि.०६/०१/२०२३ रोजीच्या कार्यकारी परिषद सभेच्या ठरावातील तपशील | प्रस्तावित दुरूस्ती | शेरा/ठराव |
|---|---|---|---|
| १ | कायम मंडळ मान्यतेच्या प्रमाणपत्रात मार्च...... पासून कायम करण्यात येत आहे, हा नमूद करण्यात आलेला मजकूर | मार्च ...... परीक्षेपासून ऐवजी शैक्षणिक वर्ष....... पासून कायम करण्यात येत आहे | सदरची दुरूस्ती शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास देण्यात येणारे कायम मंडळ मान्यतेच्या प्रमाणपत्रात करण्यात यावी असे ठरले. |
| २ | | कायम मंडळ मान्यता दिल्यानंतर शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास दयावयाच्या प्रमाणपत्रात विभागीय मंडळाच्या ज्या समितीच्या निर्णयान्वये कायम मंडळ मान्यता देत आहे, त्या समितीचे नाव (स्थायी/तदर्थ) सभेचा दिनांक व ठराव कमांक नमूद असावा. | सदरची दुरूस्ती कायम मंडळ मान्यतेच्या प्रमाणपत्रात करणेस मान्यता देण्यात आली. |
| ३ | महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम १९७७ मधील नियम क्रमांक २८/६६ मधील तरतुदीनुसार | महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे विनियम १९७७ मधील नियम कमांक२८/६६ मधील सुधारित तरतुदीनुसार असे प्रमाणपत्रात नमूद करणे आवश्यक आहे. | सदरची दुरूस्ती कायम मंडळ मान्यतेच्या प्रमाणपत्रात करावी. |
| ४ | संदर्भिय पत्रातील सूचना क. १३ 'रजिस्टरमध्ये प्रमाणपत्र क., सांकेतांक कमांक, | रजिस्टरमध्ये प्रमाणपत्र कमांक, शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचा सांकेतिक कमांक व संपूर्ण नाव, ज्या समितीच्या | रजिस्टरमध्ये प्रमाणपत्र कमांक, शाळा/कनिष्ठ महविद्यालय सांकेतिक |

मा. सचिव